## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च – २०१९

दिनांक २१/०५/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते पोलीस क्लब, पहीला मजला, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे **मार्च** –२०१९ या महिन्याचा **" BEST DETECTION OF THE MONTH "** चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च – २०१९

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–३ | गु.प्र.शा.गु.र.क्र.३०/१९ कलम ३०२, २०१, १२०(ब), ३४, ३०४ (अ) भादविसह १३४ (अ)(ब) मोटार वाहन कायदा. (वडाळा टी.टी. नगर पो.ठाणे गु.नों.क्र. १४/१४). |

–: **खून** :–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– सदर गुन्हयात फिर्यादी श्री. आझाद बरकत खान, वय ३६ वर्षे, यांचा भाऊ अखलाक बरकत खान, वय ४० वर्षे हा दिनांक १४/०१/२०१४ रोजी ००.३५ वाजेच्या सुमारास रुस्तमजी टॉवर समोर, चेंबुर, वडाळा लिंक रोड, चुनाभट्टी, सायन, मुंबई येथे सायकलवरुन जात असताना, अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील मोटर वाहन निष्काळजीपणाने चालवून, त्यांचे सायकलला ठोकर मारुन गंभीर दुखापत करुन, त्यांचे मृत्युस कारणीभूत झाला असल्याने दिनांक १४/०१/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | श्री. आझाद बरकत खान, वय ३६ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :– | अखलाक अहमद बरकत खान वय ४० वर्षे, |
| **आरोपी अटक व दिनांक** | :– | १) अमोल तात्यासाो पासोबा, वय ३३ वर्षे,<br>२) सैजुदिद्न हारुन कुरेशी उर्फ पप्पू, वय ४३ वर्षे<br>आरोपी क्र.१–अटक दिनांक २१/०३/२०१९<br>आरोपी क्र.२–अटक दिनांक ०३/०४/२०१९ |
| **पाहिजे आरोपी** | | वकिल अहमद यासिन शेख, वय ३५ वर्षे. |

**तपास कौशल्य** :– गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–३, ना.म.जोशी मार्ग मुंबई, येथील प्रभारी पोलीस निरीक्षक संजय निकुंबे यांना माहिती प्राप्त झाली की, चार ते पाच वर्षापुर्वी एका इसमाची खून करण्याची सुपारी घेवुन सदर इसम सायकलवरुन वडाळा लिंक रोडवरुन जात असताना त्यास टॅकरखाली चिरडून जिवे ठार केले. परंतु त्या गुन्हयात आरोपींना अटक झालेली नाही.

- गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष – ३, मुंबई यांनी प्राप्त माहितीचे आधारे वडाळा लिंक रोड वरील गेल्या पाच वर्षात दाखल अकस्मात मृत्यु, अपघाती मृत्यु व खुन या गुन्हयाची माहिती प्राप्त करुन, त्याचा अभ्यास केला असता, नमुद गुन्हयात दिनांक १४/०१/२०१४ रोजी ००.३५ वाजेच्या सुमारास रुस्तमजी टॉवर समोर, चेंबुर, वडाळा लिंक रोड, चुनाभट्टी, सायन, मुंबई या ठिकाणी इसम अखलाक बरकत खान, वय ४० वर्षे हे त्यांचे

सायकलवरुन जात असताना, अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील मोटर वाहन निष्काळजीपणाने चालवून, त्यांचे सायकलला ठोकर मारुन गंभीर दुखापत करुन, त्यांचे मृत्युस कारणीभूत झाला असल्याचे समजून आले. सदर गुन्हयात अज्ञात वाहन व वाहन चालक मिळून आले नसल्याने, गुन्हा उघडकीस आला नव्हता.

- सदर गुन्हयाचे कागदपत्रांची बारकाईने केलेली तपासणी व प्राथमिक चौकशीमध्ये मयत इसम हा सायकलवरुन पाव व अंडी विक्रीचा व्यवसाय करीत होता. त्या व्यवसायात त्याचे पाहिजे आरोपी वकिल अहमद यासिन शेख याचेशी भागीदारीवरुन वाद सुरु होते. गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष – ३ यांना मिळालेली माहिती खरी असल्याचे आढळून आल्याने सदरचा गुन्हा पुढील तपासकामी दिनांक २०/०३/२०१९ रोजी मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ३, गुअवि, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. सदर गुन्हयाची गुन्हे शाखेच्या पटलावर पुर्ननोंद गुप्रशा, गु.र.क्र. ३०/२०१९ कलम ३०४(अ) भादंवि सह १३४ (अ)(ब) मोटार वाहन कायदा अन्वये घेवून, गुन्हयाचा पुढील तपास सुरु केला.
- गु.प्र.शाखा, कक्ष – ३, मुंबई यांना नमुद गुन्हयातील पाहिजे अज्ञात वाहन चालकाची माहिती प्राप्त झाली. त्यावरुन दिनांक २१/०३/२०१९ रोजी आरोपी अमोल तात्यासाो पासोबा यास अनुशक्तीनगर, मानखुर्द, मुंबई ८८ येथे सापळा रचून, शिताफिने ताब्यात घेवुन, त्याचेकडे कौशल्यपुर्वक चौकशी करण्यात आली.
- चौकशीमध्ये आरोपी अमोल पासोबा याने माहिती दिली की, तो यातील अन्य अटक आरोपी सैजुदिद्न खुरेशी उर्फ पप्पू याचे पाण्याचे टॅकरवर चालक म्हणून काम करत होता. सन २०१४ मध्ये यातील पाहिजे आरोपी वकिल शेख याने मयत इसमास मारण्याची सुपारी अटक आरोपी सैजुदिद्न हारुन कुरेशी उर्फ पप्पू यास दिली होती. सैजुदिद्न कुरेशी उर्फ पप्पू याने मयत इसमास मारण्याची जबाबदारी अमोल पासोबा याचेवर सोपविली.
- यातील अटक आरोपी व पाहिजे आरोपी वकिल खान यांनी मयत इसमाच्या दैनंदिन सायकलवरुन येण्या–जाण्याचा रोड व वेळ याबाबत रेकी केली. त्यानंतर मयत इसमाचा मृत्यु हा अपघाती वाटावा अशाप्रकारची योजना आखून कट रचला. योजना आखून तयार केलेल्या कटाप्रमाणे दिनांक १४/०१/२०१४ रोजी रात्री ००.३० वाजेच्या सुमारास अखलाक खान हे त्याचे सायकलवरुन जात असताना, अटक आरोपी अमोल पासोबा याने त्याचे ताब्यातील पाण्याचे टॅकरने अखलाक खान याचे सायकलला धडक मारुन, त्यास टॅकरच्या चाकाखाली चिरडून जिवे ठार मारले आहे. सदर गुन्हयात भादवि कलम ३०२, १२० ब, २०१, ३४ या कलमांचा समावेश करण्यात आला आहे.
- अशाप्रकारे सन २०१४ मधील अपघाती मृत्यु म्हणून नोंद असलेला व उघडकीस न आलेल्या गुन्हयामध्ये कोणताही सुगावा नसताना देखील, कौशल्यपुर्ण तपास करुन व अथक प्रयत्न करुन सदरचा गुन्हा हा अपघाती नसून, खुन असल्याचे निष्पन्न करुन आरोपींना अटक केलेली आहे.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे **मार्च—२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.
- **कक्ष—३, गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री.संजय देवराम निकुंबे |
| २ | सपोउनि क्र.२४५१५ | श्री.महेंद्र मनोहर कांबळी |
| ३ | पोलीस शिपाई क्र.०३.२०८ | श्री.राहुल लक्ष्मण अनभुले |
| ४ | पोलीस शिपाई क्र.०३.१२२८ | श्री.चंद्रकांत धोंडीबा काळे |

✡✡✡✡✡✡✡

| ०२ | वाकोला पो. ठाणे परिमंडळ –०८ | गु.र.क्र.६०/१९ कलम ३५४ ड, ५००, ५०६, ५०९ भादंवि सह कलम ४३, ६६, ६७ ए माहिती तंत्रज्ञान अधिनियम सह कलम १२ पोस्को ॲक्ट २०१२. |
|---|---|---|

**–:'इंटरनेटच्या माध्यमातून अल्पवयीन मुलीचा फोटो morph अश्लिल करुन लैंगिक छळवणुक':–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– फिर्यादी यांना दिनांक २९/०१/२०१९ रोजी ११:०० वा. त्यांची १५ वर्षे वयाची बळीत मुलगी मेरीलीन डिसोझा हीने सांगितले की, ''तिला तिच्या मोबाईल फोन ९६५३२३८११३ या वर +१(४३८)७९४–२१०८ यां मोबाईल क्रमांकावरुन whatsapp वर एस.एम.एस. आले कि तिचा फोटो हा porn sites xvideos.com वर टाकलेला आहे. सदर मोबाईल क्रमांकावरुन तिला वांरवार वेगवेगळे एस.एम.एस. येत आहेत. सदरचे एस.एम.एस.,बघा.'' सदरचे बोलणे झाल्यानतंर फिर्यादी यांनी सदरचे whatsapp वरील एस.एम.एस.पाहीले असता त्यामध्ये porn sites xvideos.com वर फिर्यादी यांच्या मुलीचा एक फोटो हा नग्न असल्याचे दिसले. तसेच सदर whatsapp वरील एस.एम.एस. मध्ये आरोपीत इसमाने बळीत मुलीचे फोटो त्या पोर्न साईटवरुन काढतो पण त्यासाठी आरोपीत इसमास अजून तीन मुलींचे फोटो पाठव अशा आशयाचे एस.एम.एस. पाठवले असल्याचे फिर्यादी यांनी पाहीले त्यामुळे फिर्यादी यांची मुलगी घाबरली.

- सदर मोबाईल फोन +१(४३८)७९४–२१०८ वापर करण्या–या आरोपीताने फिर्यादी यांचे मुलीचे फोटो सोशल साईटवरुन मिळवुन ईलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करुन तो फोटो edit करुन नग्न बनवुन सदरचा नग्न फोटो हा porn sites xvideos.com वर टाकुन फिर्यादी यांच्या मुलीच्या मनास लज्जा उत्पन्न करून तिची बदनामी केली. तसेच अजून तीन मुलींचे फोटो आरोपीतास सेंन्ड कर त्यानंतर सदरचा फोटो तो त्या साईट वरुन काढुन टाकतो असे whatsapp वर एस.एम.एस. करुन तिची लैंगीक छळवणुक केली तसेच यासाठी आरोपीताने वेग–वेगळया मोबाईल क्रमांकाचा **१) + १ (२८९) ३१२–३९४३ २) +१ (७७८) ७४४–०१२७, ३) +१ (७७८) ७१६–२९०६, ४) +१ (२२६) २१५–५८२०, ५) +१ (२२४) ५१६–०२६९, ६) +१ (७७८) ७६२–५०६२, ७) +१ (२०६) ८९९–३६१८**, या मोबाईल नंबरचा वापर करुन वांरवार व्हिडीओ कॉल व एस.एम.एस. करुन त्रास दिला म्हणुन फिर्यादी यांचा सविस्तर जबाब नोंद करुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | श्री मार्टीन लुईस डीसोझा, वय ६२ वर्षे |
| **बळीत/मयत** | :– | मेरीलीन डिसोझा, वय १५ वर्षे |
| **आरोपी अटक व दिनांक** | :– | जानम प्रदीप पोरवाल वय २० वर्षे.<br>**अटक दिंनाक ११/०३/२०१९** |

**तपास कौशल्य** :– सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथक तयार केले. गुन्हा घडल्यानंतर तात्काळ गुन्हयांमध्ये वापरलेल्या इंटरनॅशनल मोबाईल नंबरबाबत माहिती मिळविण्याकरीता मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ–०८ यांच्या कार्यालयाच्या माध्यमातुन मोबाईल कंपन्याच्या नोडल अधिकारी यांना संपर्क करण्यात आला

तसेच वापरलेल्या इंटरनॅशनल कॉलचे Gateway बाबत माहिती मिळण्याकरीता पत्र व्यवहार करण्यात आला परंतु काहीही माहिती मिळुन आली नाही.

- बळीत मुलीस आरोपीताने पाठविलेल्या फोटोमध्ये त्याने XVideos या Porn site वर James नावाच्या फोल्डरमधील मुळ Porn Photo Morph करून त्यातील Porn star चा चेहरा काढून त्यामध्ये बळीत मुलीचा चेहरा लावून तो Morph केलेले अश्लिल फोटा बळीत मुलीच्या मोबाईलच्या Whataspp वर पाठविले असल्याचे दिसुन आले.
- नमुद तपासी पथकाने मोबाईल ॲपचा वापर करून https://www.facebook.com/james.yet.3 ही URL मिळवली व सदर URL ची माहिती सायबर पोलीस ठाणेच्या मदतीने Facebook कडुन मिळवली असता त्यामध्ये संशयीत आरोपीताने सदर लिंकवर रजिस्टर केलेला मोबाईल नंबर **९३४३२२३३६६ हा** मिळुन आला त्यांचे IP Address मागविण्यात आले. त्यानंतर प्राप्त डेटावरून संबंधीत ISP कंपनीकडुन माहिती मागविली असता संशयीत आरोपीताचा पत्ता व Alternate Mobile Number 9341223366 असा मिळविला. संबधीत कंपनीकडुन माहिती घेवुन आरोपीतास रूम नंबर ३४, ए विंग, गगन विहार को.ऑ.हौ.सोसायटी, खानपुर, अहमदाबाद सिटी, गुजरात येथुन आरोपीतास ताब्यात घेण्यात आले.
- **आरोपीची MOB:-**

मोबाईल फोनद्वारे **Instagram** या सोशल मिडीया ॲपवर **follow** करून मुली/महिलांनी त्यांच्या स्वता:च्या **Instagram** वर टाकलेले नॅचरल फोटो **save** करून सदर फोटो आरोपीताने त्याच्या सदर जप्त केलेल्या मोबाईलफोन मधील **Faceover Lite** या **free app** द्वारे बळीत मुलीचे फोटो **XVideos या Porn site** वरील **porn star** चा चेहरा बदलुन त्याऐवजी नमुद गुन्हयातील बळीत मुलीचा चेहरा **Faceover Lite** या **free app** द्वारे **edit** करून सदर **edit** केलेले अश्लिल फोटो बळीत मुलीच्या **whatsapp** वर पाठविले परंतु सदर **edit** केलेले अश्लिल फोटो पाठवितांना आरोपीताने **TextNow** या **free app** चा वापर करून त्याद्वारे आरोपीताने इंटरनॅशनल नंबर **spoofing call** असल्याचे भासवून सदर अश्लिल फोटो नमुद गुन्हयांतील बळीत फिर्यादी यांना तिच्या **whatsapp** वर पाठविले असल्याचे दिसुन आले.

- अशा प्रकारे सदर आरोपीने बऱ्याच मुली व महिलांसोबत केल्याचे त्याच्या मोबाईलमधील डेटावरून दिसुन येत आहे.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे **मार्च–२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील नमुद अधिकारी यांना सन्मानित केले आहे.
- **वाकोला पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिका–याचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | पोलीस उप निरीक्षक | देविदास रामदास अरण्ये |

........................